web: http://navakal.org,
e-mail- navakal.1923@gmail.com

नवाकाळ

# अवेक इंडिया टू मेक इन इंडियाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

■ मुंबई, प्रतिनिधी



मुंबईत भरलेल्या मेक इन इंडिया सप्ताहाच्या निमित्ताने युगादेश प्रकाशनातर्फे काढण्यात आलेल्या 'अवेक इंडिया टू मेक इन इंडिया' या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सदर अंकामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, अपंगत्वावर मात करीत एव्हरेस्ट सर करणारी पद्मश्री अरुणिमा सिन्हा, कौशल्य विकास मंत्री राजीव प्रताप रुडी, व्यापार आणि वाणिज्य मंत्री निर्मला सितारमण, दूरसंचार मंत्री रवीशंकर प्रसाद, नगर विकास मंत्री व्यंकय्या नायडू, शिक्षण मंत्री विनोद तावडे, मुंबई महापालिकेचे आयुक्त अजोय मेहता, एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, ज्येष्ठ वास्तुशास्त्रज्ञ दिलीप देशमुख, व्हिजन इंडिया फाऊंडेशनचे अजय शर्मा, अर्थ शास्त्र विषयाच्या अभ्यासक मंगल गोगटे, जीएसटी विषयी अभ्यास असलेल्या भावना गोखले आदी मान्यवरांबरोबरच पर्यावरण तज्ञ पूनम सिंघवी, विदुला वैद्य यांचेही लेख प्रकाशित केले गेले आहेत.

या अंकाचे मुख्य संपादक ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत जोशी असून, पूर्ण अंकाचे संपादन दिपा सरना गवली यांनी केले आहे.